जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
Address – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in Ph.020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

**प्रेस नोट दि.२८/१२/२०२४**

**दि.२७/१२/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बाणेर पो स्टे १०२८/२०२४,भा.न्या.सं.कलम ३०९(४),३(५) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ७२ वर्ष रा.बाणेर,पुणे |
| **आरोपीत** | दोन दुचाकीवरील अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि. २६/१२/२०२४ रोजी सायं.१९/०० वा चे सुमा.कॉर्नर स्टोन बिल्डींगचे समोर,बाणेर,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया नमुद ठिकाणावरून त्यांचे पतीसह भाजी घेवुन पायी जात असताना,नमुद इसम हे दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील ४०,०००/-रू.ची सोन्याची चेन व १,००,०००/-रू.कि.चे सोन्याचे मंगळसुत्र असा १,४०,०००/-रू.चा ऐवज जबरदस्तीने ओढून जबरी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. थिटे मो.नं.९८५०७२५३७१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ४८५/२०२४,भा.न्या.सं.कलम ११५ (२),३०९(४),३२४(४) |
| **फिर्यादी** | एक इसम वय २२ वर्षे रा.घोरपडे पेठ,पुणे |
| **आरोपीत** | कृष्णा पोपट मिसाळ वय ३८ वर्षे रा.लोहियानगर पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/१२/२०२४ रोजी रात्रौ २१/०० वा.सुमा.एम.एस.ई.बी.गंजपेठ पुणे येथे सार्वजनिक रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे ओळखीचा नमुद इसम याने नमुद ठिकाणी फिर्यादी यांच्या खिशात बळजबरीने हात घालून खिशातील ५००/- रु काढून घेवुन त्यांना मारहाण करून फिर्यादी यांच्या पाणीपुरीच्या गाडीचे बांबूने मारुन नुकसान केले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. महेंद्र कांबळे मो.नं.७२४९००८००८ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | आंबेगांव पो स्टे १०८४/२०२४,भा.न्या.सं.कलम,२८१,१०६,(१),१३४(अ)(ब) सह मो.वा.का.कलम १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | अशोक उघडे वय २५ वर्षे रा.आंबेगाव,पुणे |
| **आरोपीत** | चारचाकी वाहन चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/१२/२०२४ रोजी रात्रौ २३/३० वा. सुमा. साई पॅलेस हॉटेल ते विंडसर काउंटी सोसायटी आंबेगाव पुणे येथे रोड लगत असणारी पानाच्या टपरी समोरील रोडवरुन |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचे मोटार सायकलला जबर ठोस मारून,फिर्यादी यांचा मित्र सचिन मारूती मरगळे वय २५ वर्षे रा. नांदेड फाटा पुणे यांस गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. शिंदे मो.नं.९९२३२८१९८१ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड रोड पो स्टे ७७७/२०२४,भा.न्या.सं.कलम १०६(१) |
| **फिर्यादी** | विशाल खटावकर, पोलीस अंमलदार सिंहगड रोड पोलीस ठाणे पुणे शहर |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/१२/२०२४ रोजी दु.१२/३० वा. चे सुमा.वरद एंटरप्रायजेस,न-हे,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम यांनी नमुद ठिकाणी पत्र्याचे शेडचे काम करणारे विलास बाबुराव पांचाळ व पांडुरंग बाबुराव काळे यांना सुरक्षेच्या दृष्टीकोणातुन संरक्षणाकरीता सेफ्टीबेल्ट, हेल्मेट व इतर साहीत्य न पुरविता सुरक्षिततेबाबत कोणत्याही सुचना न देता कामाचे ठिकाणी संरक्षण जाळी न लावता इसम नामे विलास बाबुराव पांचाळ वय ६२ वर्षे रा.शिवणे,पुणे यांचे मृत्यूस व पांडुरंग बाबुराव काळे यांना गंभीर जखमी होणेस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.सागर पवार मो.नं.९१३००३५१९५ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे ५०५/२०२४,भा.न्या.सं.कलम १०६, १२५, २८७, २८८ |
| **फिर्यादी** | किशोर साळवे वय ३७ वर्ष रा.रामटेकडी हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/१२/२०२४ रोजी सांय.१७/१५ वा. ते १७/३० वा.चे सुमा.बी टी कवडे रोड, टर्फ सोसा. जवळ घोरपडी,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व मयत इसम असे नमुद ठिकाणी भंगाराच्या दुकानात काम करीत असताना यातील नमुद इसम यांनी भंगारात आलेल्या वस्तू फोडुन त्यातील विविध धातू वेगवेगळे करण्यास सांगितल्याने त्याप्रमाणे फिर्यादी व मयत हे काम करत असताना सुरक्षितेच्या दृष्टीने कोणतीही उपाय योजना न करता, निष्काळजीपणाने तोडफोडीचे काम करताना यातील मयत मेहमुद शेख वय ५० वर्षे रा.रामटेकडी हडपसर पुणे हा फ्रिजचा कॉम्प्रेसर फोडत असताना त्याचा अचानक स्फोट होवुन त्यामध्ये जागेवर मयत होऊन फिर्यादी व इतर दोघेजण त्यामध्ये जखमी झाले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.अतुल थोरात मो.नं.९८५०१०७६२९ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ३५३/२०२४,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४३ वर्षे रा.औंध रोड खडकी,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३१/१०/२०२३ रोजी ते दि.१७/११/२०२३ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी इक्विटस स्मॉल फायनान्स कंपनी लोन उपलब्ध करून देते अशी जाहिरात वाचल्याने त्यावरील नमुद मोबाईल धारकासी संपर्क करून.लोन प्रोसेससाठीची कागदपत्रे त्यांचे मेल आयडीवर पाठवुन नमुद मोबाईल धारक यांनी फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून पहिल्या वर्षाचे व्याज आपणास अँडव्हॉन्स भरावे लागतील असे वेगवेगळे कारण सांगून फिर्यादी यांची १०,९४,७००/- रू.ची आर्थिक फसवणूक केली. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक(गुन्हे)श्री.गजानन चोरमले मो.नं.९५९४५५३९९९ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे ४२५/२०२४,भा.न्या.सं.कलम ३१९(२),३१८(४) आयटीॲक्ट ६६(डी) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ५६ वर्षे रा.टिंगरेनगर,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/१०/२०२४ ते दि. १९/११/२०२४ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद मोबाईल धारक यांनी शेअर्स ट्रेडींग मध्ये गुंतवणूक करण्याचे बहाण्याने विश्वास संपादन करून फिर्यादीची ११,००,०२३/- रू.ची आर्थिक फसवणूक केली |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक(गुन्हे)श्री.मंगेश हांडे ९१३७४१६४६५ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मार्केट यार्ड पो स्टे १९८/२०२४,भा.न्या.सं.कलम ३१९(२),३१८(४) आयटीॲक्ट ६६(डी) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ६८ वर्षे रा. मार्केट यार्ड,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/११/२०२४ ते ०६/१२/२०२४ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद मोबाईल धारक यांनी ट्रेडिंगमार्फत नफा मिळवुन देतो असे सांगुन पैसै ट्रान्सफर करण्यास भाग पाडुन फिर्यादीचा यांचा विश्वास संपादन करुन जास्तीचा नफा मिळवुन देण्याचे बहाण्याने फिर्यादीची २१,४८,०००/-रू.ची आर्थिक फसवणूक केली |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.पाटील मो.नं.९९६०४१२२८१ |

**प्रेस नोट दि.२८/१२/२०२४**

**<u>दि.२८/१२/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते १२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>**

**९**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणी काळभोर पो स्टे ६१४/२०२४,भा.न्या.सं.कलम १०९,११८(१),१२५,१२५(अ),१८९(१),१८९(२),१९१(२),१९१(३), १९०,३५२,३५१(१) भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५), ३(२७) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३१ वर्षे रा.चव्हाणवस्ती थेऊर,पुणे |
| **आरोपीत** | सहा ते सात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/१२/२०२४ रोजी रात्रौ २०/०० वा.चे.सुमा.थेऊर रोड लगत असलेल्या जय मल्हार हॉटेल जवळील कंपाऊंड लगत. |
| **तपशिल** | यातील नमुद इसम हे फिर्यादी यांचे राहत असलेले नमुद ठिकाणी लघवी करत असताना, फिर्यादी यांनी त्यांना तेथे लघवी करु नका असे म्हणाले असता त्याचा राग मनात धरुन यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांना मारहाण करून त्यांचे कडील असलेल्या पिस्तुलातुन गोळीबार करून फिर्यादी यांना जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.अमोल घोडके मो.नं.८८८८८२४२००. |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**